**प्रेस नोट दि. २१.०१.२०२६**

**आरोपी लोकसेवक श्री. सुभाष बाबासो पाटील, वय -५४ वर्षे, व्यवसाय - नोकरी महसुल सहाय्यक, वर्ग-३ तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ यांनी तक्रारदार यांचेकडे २००/- रूपये लाचेची मागणी करून सापळा कारवाईमध्ये २००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
| **पोलीस स्टेशन** | कवठेमहांकाळ पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय ६१ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | आरोपी लोकसेवक श्री. सुभाष बाबासो पाटील, वय -५४ वर्षे, व्यवसाय - नोकरी महसुल सहाय्यक, वर्ग-३ तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ, रा. मु.पो.इरळी ता.कवठेमहांकळ जि.सांगली. |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | २००/- (दोनशे) रुपये लाचेची मागणी<br>दि.२१.०१.२०२६ रोजी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | २००/- (दोनशे) रुपये लाचेची मागणी |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि. २१.०१.२०२६ रोजी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार हे त्यांचे पत्नीचे नावे पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्म तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे घेणार होते. तकारदार हे दि.२०.०१.२०२६ रोजी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे जावून पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्म वाटप करणारे कर्मचारी यांचेकडे चौकशी केली असता नामनिर्देशन फॉर्म देणारे कर्मचारी यांनी प्रत्येक नामनिर्देशन फॉर्मचे १००/- रूपये प्रमाणे पैसे द्यावे लागतील असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी सदर कर्मचारी यास सदर १००/- रूपये रक्कमेची पावती आपण देतो का अशी विचारणा केली असता अशी कोणतीही पावती दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच सदर कर्मचारी हे प्रत्येक उमेदवार यांचेकडून प्रत्येक नामनिर्देशन फॉर्मचे १००/- रूपये प्रमाणे पैसे घेवून त्याची कोणतीही शासकीय पावती देत नव्हते. व सदर रक्कमेची नोंद देखील कोणत्याही रजिष्टरला घेत नव्हते. त्यामुळे सदर कर्मचारी हे उमेदवारांना नामनिर्देशन फॉर्म देणेकरीता प्रत्येक फॉर्मला १००/- रूपये प्रमाणे रक्कम ही कोणतीही कायदेशीर पावती न देता बेकायदेशीररित्या लाच स्वरूपात स्विकारत असलेबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. २१.०१.२०२६ रोजी पथकास दिला होता.<br><br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.२१.०१.२०२६ रोजी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे पडताळणी कारवाई केली असता लोकसेवक श्री. सुभाष पाटील, महसुल सहायक यांनी तक्रारदार यांचे पत्नीचे नावे पंचायत समिती निवडणुकीचा २ नामनिर्देशन फॉर्म देणेसाठी प्रत्येक अर्जाचे १००/- रूपये प्रमाणे २ अर्जाचे २००/- रूपये लाचेची मागणी केली.<br>त्यानंतर लागलीच दि.२१.०१.२०२६ रोजी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे सापळा कारवाई केली असता लोकसेवक सुभाष पाटील, महसुल सहायक यांनी तक्रारदार यांचेकडून २००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | त्या अनुषंगाने आरोपी लोकसेवक श्री. सुभाष बाबासो पाटील, वय -५४ वर्षे, व्यवसाय - नोकरी महसुल सहाय्यक, वर्ग-३ तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ, रा. मु.पो.इरळी ता.कवठेमहांकळ जि.सांगली यांचेविरूध्द कवठेमहांकाळ पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |
| **सापळा पथक** | श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, सांगली, श्री. योगेश चव्हाण, श्री.किशोरकुमार खाडे पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, पोपट पाटील, उमेश जाधव, चंद्रकांत जाधव, सलिम मकानदार, सुदर्शन पाटील, सीमा माने, सागर नायकुडे. |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर **९४०४०४१०६४** तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :- १) ई-मेल आयडी - dyspacbsangali@gmail.com**

(यास्मीन इनामदार)
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली**

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली

Scanned with OKEN Scanner